MHPU090061982022

**दि.कि.अर्ज क्र.२६१/२०२२**
अनिल जगताप शिंदे वि.कोणी नाही.

## २ रे दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, पिंपरी, जिल्हा पुणे यांचे न्यायालयात

**१.अनिल संजय जगताप,**

वय –३८ वर्षे, धंदा – व्यवसाय,

**२. कु. आरोही अनिल जगताप,**

वय –०८ वर्षे, धंदा – शिक्षण,

**३. चि. श्रवण अनिल जगताप,**

वय –०३ वर्षे, धंदा – अज्ञान,

अर्जदार क्र.२ व ३ तर्फे अपाक म्हणुन वडील अर्जदार क्र.१

सर्व रा. अष्टविनायक नगर, गणेश मंदिरजवळ,

जाधववाडी, बोलाईचा मळा,

चिखली बी.के. पुणे. ४११०६२ ... **अर्जदार**

**––विरुध्द––**

कोणी नाही. ... **जाबदेणार**

**अर्जदार/अर्जदारांतर्फे सुविद्य विधीज्ञ :श्री. किशोर बी. आरडकर**

**निशानी क्रमांक १ खालील आदेश**

**(दिनांक १८ नोव्हेंबर २०२४ रोजी पारीत)**

सदरचा अर्ज यातील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ प्रमाणे वारस दाखला मिळणेबाबत दाखल केलेला आहे.

०२. अर्जदार यांनी त्यांचे अर्जात शपथेवर कथन केले आहे की, अर्जदार हे मयत **स्वाती अनिल जगताप** यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. तसेच अर्जदार यांनी शपथेवर कथन केले की, अर्जदार क्र.१ हे अर्जदार क्र.२ व ३ यांचे नात्याने वडील आहेत. मयत **स्वाती अनिल जगताप** हया अर्जदार यांची पत्नी व अर्जदार क्र.२ व ३ यांची आई आहे. **मयत स्वाती अनिल जगताप** यांचे दि.१०.१०.२०२० रोजी अदित्य बिरला मेमोरियल हॉस्पीटल चिंचवड, पुणे येथे निधन झाले आहे. त्यामुळे अर्जदार यांनी मयत **स्वाती अनिल जगताप** यांचे एकमेव वारस असल्याबाबत व सदरचा अर्ज वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

०३. सदर अर्जदार यांच्याशिवाय मयत **स्वाती अनिल जगताप** यांचे अन्य इतर कोणी वारस आहे अगर कसे याबाबत **नि.क्र.०७** अन्वये जाहीरनामा–बेलीफ रिपोर्ट अर्जदाराचे घराच्या दर्शणी भागास दरवाज्याजवळ उदघोषणा नोटीस डकविण्यात आली. तसेच जाहीर नोटीस **नि.क्र.०७–अ** वर स्थानिक दैनिक वृत्तपत्र प्रभात यामध्ये दि.२३.०२.२०२४ रोजी प्रकाशीत करण्यात आली. जाहीर नोटीस स्थानिक दैनिक वृत्तपत्र व जाहीरनाम्याचे अनुषंगाने अर्जदाराच्या अर्जावर आक्षेप मागविण्यात आले.

०४. अर्जदार यांनी **नि.क्र.१** वर दाखल केलेल्या अर्जाशी सुसंगत अशा मजकुराचे सरतपासनीचे पुराव्याचे शपथपत्र **नि.क्र.७–ब** वर दाखल करून न्यायालयासमोर शपथेवर पुरावा दिला की, अर्जदार क्र.१ हे अर्जदार क्र.२ व ३ यांचे नात्याने वडील आहेत. मयत **स्वाती अनिल जगताप** हया अर्जदार यांची पत्नी व अर्जदार क्र.२ व ३ यांची आई आहे. **मयत स्वाती अनिल जगताप** यांचे दि.१०.१०.२०२० रोजी अदित्य बिरला मेमोरियल हॉस्पीटल चिंचवड, पुणे येथे

निधन झाले आहे.

०५. अर्जदार यांनी मयत **स्वाती अनिल जगताप** यांचे मृत्युबाबत पुणे महानगरपालिका, पुणे यांनी दिलेले मृत्यु प्रमाणपत्र **(नि.क्र१०)** अभिलेखावर दाखल केले आहे. तसेच अर्जदार यांनी साक्षीदार क्र.२ म्हणुन नामे प्रशांत किसन भोजने यांना **नि.क्र.११** वर तपासले असता त्यांनी त्यांचे **नि.क्र.११** वरिल पुराव्याचे शपथपत्रात शपथेवर कथन केले आहे की, अर्जदार क्र.१ हा त्यांचा मेहुना असुन अर्जदार क्र.२ व ३ यांचा नात्याने मामा आहे. मयत **स्वाती अनिल जगताप** ही त्यांची बहिण असुन दि.१०.१०.२०२० रोजी अदित्य बिरला मेमोरियल हॉस्पीटल चिंचवड, पुणे येथे निधन झाले आहे. मयत **स्वाती अनिल जगताप** यांच्या निधनानंतर अर्जदार हे एकमेव त्यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यांचेशिवाय इतर कोणीही वारस नव्हते व नाहीत.

०६. **नि.क्र.७–अ** व **नि.क्र.११** वरील अर्जदार व साक्षीदार यांचा न्यायालयासमोरील शपथेवरील पुरावा, जाहिरनामा **नि.क्र.०७**, दैनिक वृत्तपत्रातील जाहीर नोटीस **नि.०७–अ** तसेच जाहीरनाम्यानंतर प्रस्तुत अर्जाला कोणीही न्यायालयासमोर हजर होवून अर्जदार हे मयत **स्वाती अनिल जगताप** यांचे कायदेशीर वारस नाहीत असा आक्षेप घेतला नाही. तसेच अर्जदार यांनी दि.२१.०९.२०२३ रोजी पुरावा बंद पुरसीस **नि.क्र.१२** वर दाखल केली आहे. तसेच अर्जदार यांनी **नि.क्र.१३** वर केवळ औपचारीक वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे. या सर्व बाबी लक्षात घेता अर्ज नाकारण्यास कोणतेही सबळ कारण दिसुन येत नाही. त्यामुळे अर्जदार हे मयत **स्वाती अनिल जगताप** यांचे कायदेशीर वारस असल्यामुळे त्यांना वारस दाखला देण्यात येतो व मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

**अ.** अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

**ब.** अर्जदार नामे **अनिल संजय जगताप, कु. आरोही अनिल जगताप,** व **चि. श्रवण अनिल जगताप,** हे मयत **स्वाती अनिल जगताप** यांचे कायदेशीर औपचारीक वारस आहेत.

**क.** यातील अर्जदार यांनी योग्य तो न्यायालयीन मुद्रांक अदा करावा.

**ड.** सदरचा आदेश हा खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.

SATYVATI SHARADCHANDRA CHAVAN
Digitally signed by SATYVATI SHARADCHANDRA CHAVAN
Date: 2024.11.21 11:08:45 +0530

ठिकाण :–पिंपरी. (श्रीमती एस.एस.चव्हाण)
दिनांक :१८.११.२०२४ **२रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),**
**पिंपरी, जि. पुणे.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Order are the same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | :- | Smt. P. D. Kadam [Steno III] |
| Name of the Court | :- | Smt. S. S. Chavan<br>2nd Jt. J.M.F.C.,Pimpri Pune. |
| Date | :- | 18.11.2024 |
| Order signed by<br>the Presiding Officer on | :- | 18.11.2024 |
| Order uploaded on | :- | 18.11.2024 |